# शरणं गच्छामि

पोलीस खात्यातल्या कामाचं प्रत्यक्ष प्रशिक्षण घेण्यासाठी मी एक वर्षभर जळगावला होतो. जळगावहून अजिंठा जवळ असल्यामुळे अनेक बड्या पाहुण्यांचा तिथे राबता असे. प्रत्यक्ष जबाबदारी अशी माझ्यावर काहीच नसल्याने बहुतेक मलाच त्यांच्यासोबत पाठविले जाई. इतक्या वेळा मी अजिंठ्याला गेलो, की तो सारा परिसर परिचयाचा होऊन गेला. तिथे काम करणाऱ्या मंडळींच्या चांगल्या ओळखी झाल्या. एकदा सरकारी गाईड सोबत नव्हते, तेव्हा मी त्यांचेसुद्धा काम करून वेळ मारून नेली. ते ज्या वेळी जे उर्दू शेर सुनावत असत, तेसुद्धा मी पाठ झाले असल्याने म्हणून टाकले आणि माझे खूप कौतुक झाले.

अजिंठ्याच्या गुहांमधील चित्रे म्हणजे मानवी कलेचा केवढा भव्य आविष्कार आहे ! गौतम बुद्धांच्या चरित्रातले अनेक प्रसंग इतके सुंदर रेखाटलेले आहेत की थक्कच व्हायला होते. एका प्रसंगामध्ये बुद्ध भिक्षापात्र घेऊन स्वतःच्या राजवाड्यातच आले आहेत. आपल्या छोट्या मुलाला घेऊन यशोधरा दाराशी उभी आहे. तिच्या चेहऱ्यावरचे कारुण्याचे भाव अतिशय बोलके वाटतात. त्यागाची, संन्यासाची निवड गौतम बुद्धाने स्वतःच्या आयुष्यासाठी केली. यशोधरेच्या वाट्याला मात्र विरागिनीचे जीवन न मागताच आले. आमचे गाईड तो प्रसंग दाखवताना एक शेर म्हणत असत,

'यह क्या दस्तुर-ए-जुबाँबंदी है महफिल में तेरी।
के कुछ कहनेको तरसती है जुबाँ मेरी॥'

किती किती बोलायची ऊर्मी अगदी आतून येते आहे; पण तू समोर असलास, की शब्द जिभेवरच अडखळतात.

पुढे येणारं राजपद आपल्याला इंद्रियांची सुखं तेवढी देऊ शकेल. सुखं भोगणाऱ्या इंद्रियांची शक्ती ती क्षीण करून टाकणार आहेत. त्यातलं एकही शाश्वत टिकणारं नाही याची जाण झाल्यावर साऱ्या मोहांचा त्याग करून राजपुत्र गौतम बाहेर पडला. शाश्वत असणारं एकच एक निर्वाणपद त्यानं मिळवलं आणि पुढच्या पिढ्यांसाठी एक वेगळाच आदर्श घालून दिला. मुक्तीचा मार्ग त्यांच्यासाठी आखून दिला. अडीच हजार वर्षांनंतरसुद्धा गौतम बुद्धांची विचारप्रणाली आणि त्यांचे सारेच जीवन मानवी इतिहासातला एक दीपस्तंभ बनून राहिलेले आहे.

तारुण्यापर्यंत सारी सुखं हात जोडून समोर उभी होती. सत्ता, संपत्ती आणि इतर सगळी साधनं यांची कधीच वाण नव्हती. इतकी वर्षं शरीर-मनाला त्यांची सवय पडून गेलेली. हे सारे बंध-पाश त्यानं कसे तोडले असतील ? प्रेमळ पत्नी आणि आवडता पुत्र यांचे पाश तोडणं कदाचित सर्वात अवघड गेलं असावं. त्याच्या वैराग्याच्या तीव्रतेला आणि ते आयुष्यभर टिकवून धरण्याच्या निर्धाराला मनोमन शरण जायला हवं.

अर्थात, यशोधरेच्या तपश्चर्येलासुद्धा !

**– भीष्मराज बाम**

**('मना सज्जना' या पुस्तकातून)**